कार्यालयीन टिप्पणी

ससं (हप्रनि) कक्ष/ मप्रनि मंडळ
दिनांक : १९.०६.२०१३

विषय : मा.ना. श्री. संजय देवतळे, मंत्री, पर्यावरण यांच्या अध्यक्षतेखाली दि.१४/०६/२०१३ रोजी दुपारी ३.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे घेण्यात आलेल्या चंद्रपूर क्षेत्रातील प्रदूषणाबाबत आढावा बैठकीचे इतिवृत्त....

चंद्रपूर शहराच्या वाढत्या प्रदुषणामुळे चंद्रपूर क्षेत्रातील पर्यावरण सद्यस्थितीबाबत मा.मंत्री (पर्यावरण) यांच्या अध्यक्षतेखाली दि.१४ जून, २०१३ रोजी सकाळी ०३.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे आढावा बैठक घेण्यात आली. सदर बैठकीचे प्रारुप इतिवृत्त मा.मंत्री महोदयांच्या अनुमोदन व मान्यतेसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सविनय सादर.

( वि.मो.मोटघरे ) 19/6/13
सहसंचालक (हप्रनि)

मा.सदस्य सचिव :- 19/6

मा.सचिव, पर्यावरण :-

मा.मंत्री, पर्यावरण :- 20/6/13

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

**मा.ना.श्री.संजय देवतळे, मंत्री, पर्यावरण यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे दि.१४/०६/२०१३ रोजी दुपारी ३.३० वाजता घेण्यात आलेल्या चंद्रपूर क्षेत्रातील प्रदूषणाबाबत आढावा बैठकीचे इतिवृत्त...**

---

चंद्रपूर क्षेत्रातील प्रदूषणाबाबत अभ्यास करून अहवाल सादर करण्याचे कार्य महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी व संशोधन संस्था (निरी), मुंबई व आय.आय.टी., मुंबई या संस्थाना देण्यात आले आहे. सदरील बाबत आढावा बैठक दि. १४/०६/२०१३ रोजी दुपारी ३.३० वाजता मा. पर्यावरण मंत्री श्री. संजय देवतळे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे घेण्यात आली. सदर बैठकीस मा.श्री.हंसराज अहिर, खासदार, चंद्रपूर, मा. आमदार श्री. नानाजी शामकुळे, चंद्रपूर, मा.आमदार श्री.सुभाष धोटे, राजुरा, माजी विधानपरिषद सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी, चंद्रपूर, सदस्य सचिव, म.प्र.नि. मंडळ, मुंबई, जिल्हाधिकारी, चंद्रपूर, सह-संचालक (हप्रनि), म.प्र.नि. मंडळ, मुंबई, श्री. राकेश कुमार, निरी, मुंबई, श्री.वीरेंद्र सेठी, प्रो. आय.आय.टी. मुंबई, पोलीस अधिक्षक, चंद्रपूर व प्रादेशिक अधिकारी, चंद्रपूर उपस्थित होते. तसेच पर्यावरण अशासकीय संस्था व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी उपस्थितांचे स्वागत करुन चंद्रपूर कृती आराखड्याच्या अंमलबजावणीबाबतची सद्यस्थिती त्यांनी विषद केली तसेच चंद्रपूर क्षेत्रातील प्रदूषणाबाबत अभ्यास करून अहवाल सादर करण्याबाबत निरी आय.आय.टी. मुंबई या संस्थांनी म.प्र.नि. मंडळातर्फे देण्यात आलेल्या कामाबद्दल व प्रदुषणाच्या स्थितीबाबत आढावा दिला. नंतर निरी व म.प्र.नि.मंडळातर्फे विस्तृत सादरीकरण करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांनी आपले मत प्रकट केले.

श्री. मधुसुदन रुंगठा (अध्यक्ष, एम.आ.डी.सी उद्योजक संघटना, चंद्रपूर) यांनी चंद्रपूर व आसपासच्या परिसरामध्ये नविन उद्योग येण्यास तयार आहेत. परंतु केंद्र शासनाद्वारे चंद्रपूर येथील चार क्षेत्रामध्ये नविन उद्योगांना तात्पुरती बंदी केली असल्यामुळे ते सुरू होऊ शकत नाहीत असे सांगितले. चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र व वेस्टर्न कोलफिल्ड लि. च्या कोळसा खाणी या उद्योगांद्वारे सर्वाधिक प्रदूषण होत असूनसुध्दा या दोन उद्योगांवर कसलेही बंधन नसल्याचे त्यांनी सांगितले. चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राचे संच क्र. १ व २ हे सर्वाधिक प्रदूषण करत असल्याचे त्यांनी सांगितले. चंद्रपूर क्षेत्रामध्ये नविन उद्योगांना बंदी असल्यामुळे कोट्यावधी रूपयाची गुंतवणूक थांबली असून बंदी असलेल्या क्षेत्रामधील प्रदूषणाच्या विस्तारीकरणास मान्यता देण्याची त्यांनी विनंती केली.

डॉ. मंगेश गुलवाडे (इंडीयन मेडीकल असोसिएशन, चंद्रपूर) यांनी प्रदूषणात वाढ झाल्यामुळे फ्फुफुसाच्या व कान, नाक, घसा यांच्याशी शहरातील संबंधीत आजारांमध्ये वाढ झाली असल्याचे सांगितले. शहराच्या आसपासच्या क्षेत्रातुन होणारी कोळसा/खनिज/सिमेंट वाहतुक अनियंत्रीत पध्दतीने केली जात असल्याची त्यांनी तक्रार केली. चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राचे संच क्र. १ व २ यांच्या धुरांड्याची उंची कमी असल्यामुळे त्याच्या प्रदूषणाचा प्रभाव शहरातील लोकांवर होतो असे त्यांनी सांगितले.

मा. खासदार श्री. हंसराज अहीर यांनी चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रमुळे होणारे प्रदुषण व अनियंत्रीत खनिज/सिमेंट वाहतुक या महत्वाच्या समस्या असल्याचे सांगितले. म.प्र.नि. मंडळातर्फे औष्णिक विद्युत केंद्रातर्फे न धुतलेला व कमी प्रतीचा कोळसा वापरला जात असुनही म.प्र.नि. मंडळातर्फे त्यावर कार्यवाही होत नसल्याची त्यांनी तक्रार केली. विद्युत केंद्राचे नविन दोन संच सुरू करण्याअगोदर सर्वात जुने दोन संच बंद करण्याची त्यांनी मागणी केली.

..२..

त्यांनी निरी या संस्थेद्वारे अभ्यास केला जात असतांना चंद्रपूर येथील लोकांच्या आरोग्यावर प्रदूषणाचा काय परिणाम होतो आहे याबाबतसुध्दा अभ्यास करण्याचीसुचना केली. कारखान्यांद्वारे हवा प्रदूषण नियंत्रसाठीची यंत्रणा ही रात्रीच्या वेळेस बंद ठेवण्यात येत असल्याची त्यांनी तक्रार केली व कारखान्यास प्रदूषण नियंत्रणास बाध्य करण्याकरीता फक्त बँक हमी जप्त करणे हा उपाय नसून संबंधीत कारखाना बंद केला जावा अशी त्यांनी सुचना केली. कोळश्याचा राखेमध्ये (Fly Ash) मक्युरीचे प्रमाण वाढत आहे का याबाबतसुध्दा अभ्यास करण्याची आवश्यकता त्यांनी विशद केली व हे प्रमाण वाढत असल्याचे आढळून आल्याची माहिती दिली.

कोळश्याची वाहतूक कमी करण्याच्या दृष्टीने कोळसा कन्व्हेअर बेल्टद्वारे पाठविणे आवश्यक असल्याचे सांगून याबाबत कोळसा खाणींना व विज प्रकल्पास बाध्य केले जावे. तसेच वाहतुकीमुळे उडणाऱ्या धुळीचे नियंत्रण करण्यासाठी रस्त्यालगत बांबूची झाडे लावण्यात यावीत अशी त्यांनी सुचना केली. म.प्र.नि. मंडळाच्या चद्रपूर येथील प्रादेशिक कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्यात वाढ केली जावी असे त्यांनी सचविले तसेच चंद्रपूर क्षेत्राच्या अभ्यासा सोबत वरोरा, भद्रावती, माजरी, गडचांदूर व सास्ती या क्षेत्राचासुध्दा अभ्यास केला जावा असे सुचविले.

श्री. सुरेश चोपने (ग्रीन प्लॅनेट सोसायटी, चंद्रपूर) यांनी वायू प्रदूषणासोबतच जल प्रदूषणातसुध्दा वाढ होत असल्याचे सांगून वर्धा, इरई व झरपट नद्यांचे पाणी उद्योगांमुळे प्रदूषण, तसेच वे.को.ली.च्या खाणींमधून निघणारे पाणी सर्रासपणे नद्यांमध्ये सोडले जात असल्याबाबत नमुद केले. शहरातील वायू प्रदूषणास कोळशाचा मोठ्या प्रमाणावर घरगुती वापर हासुध्दा कारणीभूत असल्याचे त्यांनी सांगितले. या अनुषंगाने रॉकेलचे योग्य प्रकारे वितरण केले जावे अशी त्यांनी सुचना केली.

श्री.योगेश्वर दुधपचारे यांनी हवेच्या गुणवत्तेची माहिती थेट प्रसारीत केली जाण्याची मागणी केली व सध्या आदल्या दिवशीची माहिती दर्शविली जाते असे सांगितले. उन्हाळ्यामुळे रात्रीसुध्दा तापमानात घट होत नसल्यामुळे याबाबतीत योग्य प्रकारे अभ्यास केला जावा अशी त्यांनी सुचना केली. तसेच श्री. बंडु धोतरे (इको-प्रो, चंद्रपूर) यांनी चं. म. औ. वि. कें. यांचे संच क्र. १ व २ हे सर्वाधिक प्रदूषण करत असल्यामुळे बंद केले जावेत. उत्सर्जनाबाबतचे मापदंड या दोन संचाद्वारे ओलांडले जातात. त्यामुळे प्रदूषणास विद्युत केंद्र जबाबदार असल्याचे कळविले.

मा. आमदार, श्री. नानाजी शामकुळे (चंद्रपूर) यांनी मे.ए.सी.सी. सिमेंट व लॉयड मेटल्स या कारखान्याच्या प्रदूषणामुळे आजूबाजूची गावे प्रभावित होताहेत असे त्यांनी सांगितले. बरेच कारखाने २० ते २५ वर्ष जुने असून तीच यंत्रे सद्यास्थितीत वापरली जात आहेत त्यामुळे प्रदूषणात वाढ होत आहे. उद्योगांचे विकेंद्रीकरण केले जावे व कोळशास इतर पर्याया बद्दल अभ्यास केला जावा अशी त्यांनी सुचना केली. विद्युत केंद्राद्वारे आधी वॉश कोल वापरला जात होता. परंतु आता अनवॉशड कोल वापरला जातो. कोल डेपो मध्ये वापरला जाणारा कोळसा अवैध असतो व कृती आरखडयाची प्रत्यक्ष अमंलबजावणी केली जावी अशी त्यांनी सुचना केली. कारखान्यांनी त्यांच्यासाठी स्वतःचे पाण्याचे स्त्रोत निर्माण करावेत तसेच सिंचनाचे पाणी उद्योगांना देऊ नये असे त्यांनी नमुद केले.

मा.आमदार, श्री. सुभाष धोटे (राजुरा) यांनी बिल्ट ग्राफिक पेपर पोडक्टस लि. या उद्योगाद्वारे स्लजची विल्हेवाट योग्य प्रकारे लावली जात नसल्याची तक्रार केली या उद्योगामुळे वर्धा नदीचे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असून खालील गावामध्ये दुषित पाणी वापरले जाते. ऑटो रिक्षा व खाजगी वाहनांमध्ये सुध्दा मोठ्या प्रमाणात रॉकेलचा वापर होत असल्यामुळे प्रदूषणात वाढ झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

..३..

आयुक्त, चंद्रपूर म.न.पा. यांनी आरोग्याबाबतच्या निकषांची पाहणी व अभ्यास हा पावसाळयामध्ये सुध्दा केला जावा अशी सुचना केली. त्यांनी म.न.पा. चंद्रपूर यांच्या नागरीसांडपाणी प्रक्रियेसाठीच्या एका संयंत्राचे काम जवळपास पुर्ण झाले असून एका संयंत्रासाठी रेल्वे विभाग व राष्ट्रीय महामार्ग विभाग यांची परवानगी मिळणे बाकी आहे अशी माहिती दिली. सदरील एक संयंत्र पावसाळ्यानंतर सुरु होईल असे सांगून नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे काम अंतिम टप्यात असल्याची त्यांनी माहिती दिली.

पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांनी कोळसा चोरी प्रकरणी नाकाबंदी करुन तपासणी करण्यात आली व तपासणी दरम्यान कोळसा चोरीचा प्रकार आढळुन आला नसल्याचे तसेच इंधनातील भेसळ तपासणीसाठी व कोळसा वाहतुकी दरम्यान अति भार तपासण्यासाठी विशेष मोहिम राबविली जाते अशी माहिती दिली.

जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी सर्व कोळसा डेपो बंद करण्यात आल्याची तसेच इंधनातील भेसळ तपासणीसाठी वेळोवेळी विशेष मोहिम राबविली जाते. तसेच सभेमध्ये चर्चिल्या गेलेल्या सर्व मुद्दयांची अंमलबजावणी योग्य प्रकारे केली जाईल असे त्यांनी सांगितले.

मा.श्री.संजय देवतळे, मंत्री (पर्यावरण) यांनी आपले अध्यक्षीय भाषणामध्ये विषद केले की, चंद्रपूर क्षेत्रातील पर्यावरणाचा होणारा ऱ्हास रोखण्यासाठी यापूर्वी अनेकदा आढावा बैठक घेण्यात येऊन सुचना प्रदान करण्यात आल्या असून त्याचा आढावा घेण्यासाठी ही बैठक घेण्यात आली आहे. चंद्रपूर क्षेत्राचे पर्यावरण स्थितीबाबत शास्त्रीयदृष्ट्या अभ्यास करण्यासाठी निरी, मुंबई व आय.आय.टी., पवई या संस्थांना आमंत्रित करण्यात आले असून मंडळाकडून ३२ लक्ष रू. अभ्यास अहवालाकरीता देण्यात आले आहे व या संस्थेद्वारे वर्षभरामध्ये अहवाल सादर करण्यात येईल. सदर अहवाल परिपूर्ण करण्यासाठी स्थानिकांना विश्वासात घेऊन त्यांचे सुचनांचा अंतर्भाव कृती आराखड्यामध्ये करण्यासाठी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन प्रत्येक महिन्यात बैठक घेण्याचे मा.मंत्री महोदयांनी निर्देश दिले. कोळसा डेपो, जड वाहतूक, अवैध पार्किंग, ताडपत्री आच्छादन, वाहतूक नियोजन आदिंमुळे होणाऱ्या समस्यांच्या निपटाऱ्याकरीता विविध विभागांच्या अस्तित्वात असलेल्या कायदे व नियमांचा वापर करून शिघ्रकालीन कृती आराखडा तयार करून व तो विविध विभागांनी राबवून व कडक कारवाई करून समस्या निकाली काढण्याचे निर्देश दिले व सदरची कारवाई नियमितपणे राबविण्याबाबत त्यांनी सुचना केली.

तसेच प्रदूषणास कारणीभूत सर्व मुद्दयांचा सांगोपांग अभ्यास केला जाणार असून त्यावर योग्य उपाययोजना करण्यात येतील, तसेच सभेमध्ये चर्चिल्या गेलेले सर्व मुद्दे अभ्यासा दरम्यान विचारात घेतले जातील असे सांगितले. वाहतुकीमुळे होणाऱ्या प्रदूषणासाठी केवळ वाहनचालकास दोषी न धरता संबंधी वाहतुकदारांवर सुध्दा कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मा. खासदार व आमदार व इतरांनी सुचविलेल्या सर्व बाबी अभ्यासादरम्यान घेतल्या जातील असे त्यांनी सांगितले.

उपस्थितांचे आभार मानुन मा.अध्यक्षांच्या परवानगीने बैठक समाप्त झाली.

\- - - - - -